अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# चेंगराचेंगरी आणि सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न

धार्मिक कार्यक्रमांमध्ये चेंगराचेंगरी होणे हा प्रकार भारतामध्ये नवीन नाही. आपला समाज मुळातच श्रध्दावान आहे. त्याच्या भावनांना कोणीही आवर घालू शकत नाही. कदाचित प्रत्येक समाजाची ती भावनिक गरजही असू शकते. मुंबई हे मुळातच गर्दीचे शहर मानले जाते आणि याच मुंबईमध्ये बोहरा समाजाचे धर्मगुरू संय्यदना यांच्या अंत्ययात्रेच्यावेळी चेंगराचेंगरी होण्याचा प्रकार एक नवा धडा देणारा ठरतो. संय्यदनांचे त्या समाजातले स्थान फार मोठे होते आणि त्यांच्याविषयी भारतातल्या करोडो बोहरा समाजाची श्रध्दा तेवढीच ताकदवान होती हे त्यांच्यासाठी जमलेल्या कोट्यवधी लोकांवरून सिध्द होते. फक्त मुंबईच्या दक्षिण भागामध्ये त्यांच्या अंत्ययात्रेप्रसंगी जी चेंगराचेंगरी झाली त्यात तब्बल अठराजणांना प्राण गमवावे लागले. रोज कुठे ना कुठे अपघात होत असतात. परंतु त्यात मनुष्यहानी होणे अत्यंत दुर्दैवी ठरते. मुंबईतल्या या चेंगराचेंगरी प्रकाराने काही नवे प्रश्न उपस्थित केले आहेत आणि भविष्यकाळामध्ये अशा प्रकारांबाबत किती दक्षता घेतली पाहिजे याकडे या घटनेने लक्ष वेधले आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, मुंबईत यापुढे अशा भरमसाट गर्दीचे कार्यक्रम घेणे टाळले पाहिजे. कारण मुंबईची भौगोलिक रचना ही अन्य शहरांप्रमाणे नाही, ती निमुळती स्वरूपाची रचना आहे. या महानगराच्या तीनही बाजूला समुद्र आहे आणि या महानगरातून बाहेर पडण्याकरता फक्त एक किंवा दोन मार्गच उपलब्ध असतात. प्रामुख्याने दक्षिण मुंबईमध्ये प्रमाणाबाहेर गर्दी झाली तर तिच्यावर नियंत्रण ठेवणे कोणालाही शक्य होत नाही. कितीही सुरक्षा व्यवस्था तैनात ठेवली तरी जागेच्या मर्यादेमुळे ती गर्दी काबूत राहणे अशक्यप्राय होते. गेल्या वीस वर्षांमध्ये या महानगरातली लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढली. सरकारी आकडेवारीप्रमाणे इथली लोकसंख्या सव्वाकोटी असली तरी अनधिकृतपणे मुंबईची लोकसंख्या दीड कोटीच्या वर नक्कीच असावी, असा अंदाज आहे. याच्या दुप्पट वेगाने मुंबई आणि उपनगरांमध्ये वाहनांची संख्या वाढते आहे. या सर्वांना पुरेल एवढी जागा आता मुंबईत राहिलेली नाही. राहण्याची किंवा वाहनांच्या पार्किंगची जरी सोय झाली तरी जागा तेवढीच राहते, रस्ते तेवढेच राहतात आणि अशा व्यस्त प्रमाणामध्ये लोकांची संख्या वाढत गेली तर दक्षिण मुंबईत लोकांच्या या गर्दीला नियंत्रित करणे कोणत्याच यंत्रणेला शक्य होणार नाही. मलबार हिल भागातल्या चेंगराचेंगरी प्रकरणाने मुंबईतल्या या मुलभूत गोष्टीबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. कफ परेडपासून ते थेट इकडे दादर-बांद्र्यापर्यंत जागेची मर्यादा लक्षात घ्यावी लागते. अशावेळी या भागामध्ये जर का ही मोठी गर्दी होणारे कार्यक्रम होत असतील तर त्याबाबत फार मोठी दक्षताही घ्यावी लागेल. किंबहुना असे गर्दीचे कार्यक्रम होणारच नाहीत हाच त्यावरचा एकमेव उपाय ठरतो.

## वेगाने बदललेली मुंबई

गेल्या वीस वर्षांत मुंबईचे स्वरूप झपाट्याने बदलते आहे. जागेची टंचाई किंवा मर्यादा लक्षात घेऊन सरकारला उपाययोजना कराव्या लागत आहेत. अन्यथा दक्षिण मुंबईमध्ये माणसाला पाय ठेवायला जागा राहणार नाही, असे चित्र निर्माण झाले असते. ही सगळी वेगाने बदलणारी परिस्थिती लक्षात घेऊनच मस्जिदचा जवळपास सगळा घाऊक बाजार हा नव्या मुंबईत हलवावा लागला. त्यामुळे तिथे येणारी अवजड वाहने वडाळा ट्रक टर्मिनसमध्ये रोखून ठेवणे शक्य झाले. रोज येणारे अनेक टँकर जर त्याच संख्येने दक्षिण मुंबईत येऊ दिले असते तर आज काय भयानक परिस्थिती उद्‌भवली असती याचा अंदाज येतो. या घाऊक बाजारापाठोपाठच अनेक राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना मंत्रालयावर मोर्चे घेऊन येत असत. मुंबई विद्यापीठाजवळच्या काळा घोडा परिसरात हे मोर्चे रोखले जायचे. त्या मोर्चांचे तिथेच सभेत रूपांतर केले जायचे. मात्र त्यातून रहदारीची वाहतुकीची आणि पर्यायाने सामाजिक सुरक्षिततेचीसुध्दा समस्या उद्‌भवत गेली आणि मग लाखोंच्या संख्येने येणाऱ्या मोर्चेकऱ्यांवर किंवा निदर्शकांवर नियंत्रण ठेवणे सोपे नाही याचा अंदाज पोलिसांना आला. आणि म्हणून त्यांनी आता हे मोर्चे आझाद मैदानातच विसर्जित करण्याची सक्ती केली जाते. तरीसुध्दा अनेकवेळेला महापालिका आणि आझाद मैदान परिसरामध्ये होणारी ही गर्दी नियंत्रणात राहीलच याची खात्री देता येत नाही. दोन वर्षांपूर्वीच अशाच एका धार्मिक कार्यक्रमात गोंधळ माजला आणि ही परिस्थितीही पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेली होती. कारण थोड्याशा जागेतही ही गर्दी सैरभैर होते. आणि कोणत्याही अनुचित प्रकाराची ठिणगी पडते. हाच अनुभव आता दादरच्या शिवाजी पार्क मैदानाबाबत येऊ लागला आहे. शिवाजी पार्कवर होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांना होणारी गर्दी नियंत्रणात ठेवता येत नाही. वाहतुकीच्या समस्येपासून रेल्वे स्थानकांमध्ये उसळणाऱ्या गर्दीपर्यंत अनेक पेचप्रसंग निर्माण होतात. म्हणून आता शिवाजी पार्क मैदानावरही अशा मोठ्या कार्यक्रमांना बंदी घातली जाते. त्यांना बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स किंवा सायनच्या सोमय्या मैदानावरच कार्यक्रम घेण्याचे सुचवले जाते. हे सगळे निर्णय मुंबईच्या बदलत्या सामाजिक जीवनाच्या सुरक्षिततेशी निगडित ठरतात.

## गर्दीचा दुराग्रह सोडावा लागेल

भविष्यकाळाचा विचार केला तर रोज लोकलच्या गर्दीने इकडून तिकडे धावणारी मुंबई आणखी ताण सहन करू शकणार नाही. इथल्या गर्दीच्या कार्यक्रमांवर आणि उपक्रमांवर दक्षता बाळगावी लागेल. मलबार हिल भागातला हा चेंगराचेंगरीचा प्रकार मुंबईच्या सामाजिक सुरक्षिततेकडे इशारा करणारा मानावा लागेल. कार्यक्रम धार्मिक असो किंवा राजकीय स्वरूपाचा असो, मुंबईच्या भूगोलाचा विचार करणे आता अपरिहार्य ठरेल. पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. मर्यादित जागा आणि अमर्याद गर्दी अशा कात्रीमध्ये मुंबईचे समाजजीवन सापडलेले आहे. त्यातून अतिशय समंजसपणे मार्ग काढावा लागेल. अन्यथा आपणच आपल्या पायावर दगड पाडून घेतल्यासारखे होईल. वीस वर्षांमध्ये काळा घोड्यापासून आझाद मैदानापर्यंत या गर्दीला मागे रेटण्याचे काम सरकारी यंत्रणांना करावे लागले. आता शिवाजी पार्कपासून ही गर्दी बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स किंवा सोमय्या मैदानापर्यंत मागे रेटावी लागत आहे. आणखी काही वर्षांत तर मुंबईत वाहने आणण्यावरच बंदी घालावी लागेल. एकतर इथे माणसांना जागा मिळेल किंवा वाहनांसाठी जागा असेल. यातून माणसाचाच विचार करावा लागणार असल्यामुळे गर्दीचा दुराग्रह सोडून द्यावा लागेल.